*Review Of Research*
Vol.2, Issue. 9, June. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

**RESEARCH PAPER**

# *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सत्याग्रह आणि त्यावेळची ब्रिटिश सरकारची भूमिका*

*प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड*

विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

## *पार्श्वभूमी :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तीमत्त्व असे एक दिव्य क्रांतीमय स्वरुपात होते की, हजारो वर्षे पददलीत समाजाच्या उद्धारासाठी पृथ्वीवर अवतरलेला एक महामानव होय. बालपणापासून सुभेदार रामजी यांनी त्यांच्यावर जे संस्कार रुजविले होते ते त्यांना समाजोद्धाराच्या कार्यापासून अलिप्त ठेवू शकत नव्हते. त्यांना समजायला लागल्यापासून त्यांच्या मनाने एकच ध्यास घेतला होता तो म्हणजे आपल्या पददलीत जनतेचा उद्धार करणे त्यांच्या दुःखाला, वेदनेला वाचा फोडणे यासाठीच आपला जन्म झोला आहे असे त्यांचे ठाम मत होते. त्यासाठीच त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून उच्च विद्या संपादन करूनही स्वस्वार्थ न बघता समाज उद्धाराच्या कार्याला वाहून घेतले होते. त्यामुळे ते मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापक पदाच्या नोकरीमध्ये रममाण होऊ शकले नव्हते.

## *मूकनायक मासिक :*

दलितांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी 31 जानेवारी 1920 रोजी ‘मूकनायक’ नावाचे मासिक सुरू केले होते व एका अर्थाने मूकनायकाच्या रूपाने त्यांनी मूकसमाजाचे नेतृत्व स्वीकारले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘मूकनायकातून बहिष्कृत वर्गाची अवनत अवस्था होण्याची कारणमीमांसा मांडली होती. हिंदू धर्मातील जन्मानुसार निश्चित करण्यात आलेली पवित्र–अपवित्रतेची भावना तसेच ब्राह्मण–ब्राह्मणेतर वर्ग देखील स्वतःला आपल्यापेक्षा खालच्या जातीच्या लोकांना कमी लेखून स्वतःला श्रेष्ठ समजू लागला होता. हिंदू धर्मातील निर्माण झालेल्या या गोंधळाच्या परिस्थितीचा सवर्णांना अधिक लाभ होईल अशी समाजरचनाच बनविण्यात आली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तिन्ही वर्गाचे समाजावर प्रभुत्व असेल व सर्वात शेवटचा वर्ग म्हणजे शूद्रातिशूद्र योन या तीनही वर्गाचे श्रेष्ठत्व मान्य करून या वर्गाची सेवा करावी असे निश्चितीकरणच जणू करण्यात आले होते. त्यामुळेच चौथ्या वर्णाची वर्गाची अवस्था हीन–दिन झालेली होती, दारिद्र्य, अज्ञान व लाचारी या अवस्थेत जगत असतांना बहिष्कार व अस्पृश्यतेचा कलंक त्यांच्या माथी मारल्यामुळे त्यांना सार्वजनिक रस्त्यावरून चालण्यास देखील मज्जाव करण्यात आला होता. पेशव्यांची राजधानी असलेल्या पुणे शहरात तर त्यांच्या सावलीचा देखील विटाळ मानला जात होता. पददलितांवर अस्पृश्यता लादण्यात आल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन उपलब्ध नव्हते. त्यांना व्यापार, व्यवसाय करण्यास तर मनाई होतीच परंतु विद्या संपादन करणे देखील त्यांच्या नशीबी नव्हते. वरिष्ठ हिंदूच्या मनात त्यांच्याविषयी अत्यंतिक तिरस्काराची भावना होती. त्यामुळे त्यांना साधे जीवन ‘माणूस’ म्हणून जगता येत नव्हते. या अवस्थेत सत्व, स्व–अस्मिता विसरलेल्या समाजाला जाग.त करण्यासाठी व हिंदू धर्माविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्यासाठी बाबासाहेबांना सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिणे भागच होते. एकूणच त्यांच्या सत्याग्रहाविषयी हिंदूधर्माची व त्यावेळी सत्ता काबीज केलेल्या ब्रिटिश सरकारची भूमिका काय होती हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## *डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सत्याग्रह – भूमिका :*

आपल्या उद्धारासाठी कुणी भगवंत अवतार घेईल व आपला उद्धार करील या भ्रमात न राहता व स्वतःच्या

**Title:** *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सत्याग्रह आणि त्यावेळची ब्रिटिश सरकारची भूमिका* **Source:Review of Research [2249-894X]** *प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड* **yr:2013 vol:2 iss:9**

उद्धाराचा मार्ग स्वतःच शोधा इतरांना आपल्याविषयी सहानुभूती किंवा दया वाटेल असे नाही. त्यामुळे आपली मुक्ती आपणच करण्यासाठी, अन्यायाचे दुष्टचक्र भेदण्यासाठी सत्याग्रहासारखा दुसरा मार्ग आपल्याकडे नाही. मुकनायक या प्रभावी वृत्तपत्राच्या सहाय्याने पददलितांना मौलिक संदेश देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेबांनी सुरू केला होता. याची सुरूवात माणगाव परिषदेपासून झाली होती. छत्रपती शाहू महाराज अस्पृश्योद्धारासाठी स्वतः जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. ही फार मोठी बाब असल्यामुळे जाहीरपणे त्यांचा गौरव करावा व यासाठी माणगाव येथे सर्व अस्पृश्य बांधव जमा झाले होते. संघटीत होवून एकत्र येण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रयत्न होता. या परिषदेत अस्पृश्यांनी गुलामगिरीला कंटाळून हीनता आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रथा सोडण्याचा निर्धार केला होता. परंतु अस्पृश्यांनी स्वतः संघटीत होण्याच्या बाबीवर हिंदू धर्मीय नाराज झाले व या परिषदेनंतर गावातील स्पृश्यांनी स्थानिक अस्पृश्यांचा अनेक प्रकारे छळ सुरू केला. अस्पृश्यांना गावात घेण्याची, दुकानातून माल खरेदी करण्याची, बायकामुलांना जंगलातून सरपण आपण्याची, मोटेवरून पाणी भरण्याची बंदी केली, त्यामुळे अस्पृश्य लोक शेजारच्या गावातून माल खरेदी करून आणू लागले. दोन ते तीन मैल लांब नदीवरून पाणी आणण्यास जाऊ लागले. अस्पृश्यांवरील राग म्हणून परिषद संपल्यावर दुसऱ्या दिवसापासून स्पृश्य लोकांची गुरे मेल्यावर त्यांची विल्हेवाट ते स्वतःच लावू लागले. गावात तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली. त्यामुळे अस्पृश्यांपुढे पुन्हा एक नवीनच संकट निर्माण झाले. त्यामुळे त्यांनी कागलच्या संस्थानिकांकडे अर्ज केला. अस्पृश्यांच्या या संघटीत होण्याच्या चळवळीची सुरुवात किती कठीण स्वरुपाची असणार आहे याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आलेली होती.

### *चवदार तळे सत्याग्रह आणि ब्रिटिश सरकारची भूमिका :*

बहिःष्कृत हितकारीणी सभेची स्थापना जुलै 1924 रोजी झाली. 20 व्या शतकाच्या प्रारंभी मुंबई इलाख्यात समाज सुधरणेच्या हेतुने उच्च वर्णियांनी काही संस्था स्थापन केल्या होत्या. परंतु त्यांचे कार्य उच्चवर्णीय व मध्यम वर्गापुरते मर्यादित होते. अस्पृश्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अशा संस्थांमध्ये स्थान नव्हते. निराश्रित सहाय्यकारी मंडळी या संस्थेने अस्पृश्यउद्धाराचे कार्य हाती घेतले. परंतु हिंदू धर्माची पोलादी चौकट कायमच होती. उच्च वर्गीयांची भावना न दुखावता सुधारकांना हे कार्ये कितीही वर्षे चालले तरी हरकत नव्हती. एका बाजूने अस्पृश्यता निवारणाची वेळ अजून आली नाही असे म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूने अस्पृश्यांविषयी पोकळ सहानुभूती दाखवायची असाच बालीशपणा सुरू होता.

### *संस्थात्मक वाटचाल :*

अशा परिस्थितीत अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्ये प्रभावीपणे चालविण्यासाठी एखादी संस्था असावी असे डॉ. आंबेडकरांना वाटू लागले होते. त्या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी 9 मार्च 1924 रोजी दामोदर हॉल मुंबई येथे समाज सुधारकांची बैठक झाली. प्रत्यक्षात 20 जुलै 1924 रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली. 'शिकवा चेतना आणि संघटीत करा' हे या संघटनेचे ब्रीदवाक्य होते. अस्पृश्यता निवारणाच्या या प्रचंड अशा राष्ट्रीय कार्यात अस्पृश्यांबरोबर स्पृश्यांचाही सहभाग असला पाहिजे तरच या कार्यात यश येईल या भावनेने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बऱ्याच सधन आणि सहानुभूतीदार असलेल्या उच्चवर्णीयांचा समावेश केला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केल्यानंतर मुंबई प्रांतात अस्पृश्यतेच्या कार्याला सुरूवात केली. सुरुवातीला दोन वर्षाच्या काळात अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने या संघटनेने बरेच उपक्रम राबविले. त्यातूनच अस्पृश्यांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणीव निर्माण करून ते प्रत्यक्षात प्राप्त करण्यासाठी एखादे आंदोलन उभारणे आवश्यक होते. ज्या आंदोलनामुळे उच्चवर्णीय सनातन्यांना हादरा बसेल व क्रांतीचे लोण सर्वत्र पसरले म्हणून सुरुवात कोणत्या भागापासून करावी याचे विचारचक्र बाबासाहेबांच्या मनात सुरू होते. सुरुवातीला पंढरपूर पासून सुरुवात करावी असेही त्यांना वाटले होते. परंतु विठोबाचे देऊळ किंवा भीमा नदीवरील ब्राह्मणांसाठी राखून ठेवलेले घाट व रावबहादूर सी के बोले यांच्या ठरावाच्या मर्यादेत कितपत येतील याची त्यांना शंका होती. तसेच अस्पृश्यांनी या तीर्थक्षेत्रावरून केलेली सुरवात आणि त्यातून उद्भवलेली लढाई कितपत पुढे टिकविता येईल याबद्दल त्यांच्या मनात साशंकता होती. पंढरपुरच्या तुलनेने कोकणातील महाड हे ठिकाण समतेच्या लढ्याचा प्रारंभ करण्याच्या दृष्टीने योग्य आहे असे त्यांना वाटू लागले. बहिष्कृत हितकारणी सभेने या जागृतीचे कार्य प्रभावीपणे केल्यावर त्याचे लोण कोकणात न्यावे व कोकणात क्रांतीचा वणवा पेटवावा म्हणजे तो सर्वत्र पसरेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटल्यामुळे चवदार तळ्याचा महाड सत्याग्रह करण्याचे ठरविले गेले. कोकण प्रांतांतील महारांना तेथील धार्मिक व सांस्कृतिक जीवनात महत्त्व होते. भूमीपुत्र म्हणून ते ओळखले जात होते. या प्रांतात महारांची एकेकाळी स्वतंत्र राज्ये होती. इतर प्रांतापेक्षा या प्रांतातील महार हे शूर जातीचे असल्यामुळे छत्रपती शिवरायांच्या तसेच ब्रिटिशांच्या लष्करी सेवेत उत्तम कामगिरी बजावलेली होती. या लढ्यासाठी देखील त्या ठिकाणच्या महार जातींच्या लोकांमधील उत्साहाचा, शारीरिक, बौद्धिक, नैतिक व मानसिक शक्तीचा वापर या लढ्यासाठी करता येईल हे डॉ. बाबासाहेबांनी हेरले होते व सनातन्यांशी चिवट झुंज देणे शक्य होईल असे बाबासाहेबांना वाटत होते.

### *महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह :*

20 मार्च 1927 रोजी कुलाबा येईल जिल्हा बहिःष्कृत हितकारिणी वर्गाच्या परिषदेच्या दुसऱ्या दिवशी अस्पृश्यांत सार्वजनिक विहीरी आणि तलावाचा वापर करण्यासंबंधीचा ठराव पास करण्यात आला. याचवेळेस महाड म्युनिसिपालटीने इ. स. 1924 मध्ये येथील पाण्याचा तलाव अस्पृश्यांसाठी सुरू केला आहे असा ठराव केला होता. याकडे बाबासाहेबांनी लक्ष वेधले व अस्पृश्यांनी या ठरावाची अंमलबजावणी करावी म्हणजेच तलावावर पाणी भरण्याचा हक्क गाजवावा असे ठरले. त्याप्रमाणे दुपारी 1.00 वाजता परिषद आटोपल्यावर संपूर्ण महार मंडळी डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मणांच्या मध्यभागी असलेल्या चवदार तळ्यावर पाणी भरण्यसाठी गेले. ही बातमी सर्वच स्पृश्य जातींमध्ये पसरली त्यामुळे खळबळ माजली. परंतु त्याबाबत कुणीही आक्षेप घेतला नाही. कारण 1924 मध्ये महाड नगरपालिकेच्या कायदेमंडळाने पास केलेल्या ठरावाचा परिणाम आहे. त्यांना ज्ञात असावे. सरकारने या ठरावाद्वारे सर्व सार्वजनिक पाणवठे सुरू करावेत असे आदेशच सर्वत्र पाठविले होते. परंतु चवदार तळ्यावर पाणी भरल्याबरोबर विरेश्वर मंदिराचा पुजारी (गुरव) गावातून असे ओरडत सुटला कि, महार लोक विरेश्वराचे मंदिर आणि त्या लगतचा तलाव भ्रष्ट करणार आहेत. ही अफवा ताबडतोब पसरली आणि गावच्या सर्व भागातून जमाव गोळा झाला आणि त्यांनी महारांना मारहाण करण्यास सुरुवात केली. या प्रसंगी मामलेदार, पोलिस इन्स्पेक्टर, सब–इन्स्पेक्टर त्वरीत घटना स्थळी गेले व दोन्हीकडच्या जमावाला एकमेकांपासून बाजूला केले. डॉ. बाबासाहेबांनी स्पृश्य जमावासमोर जाऊन आपली भूमिका स्पष्ट केली कि, अस्पृश्यांना विरेश्वर मंदिरात जायचेच नव्हते. परंतु त्यामुळे मंदिर भ्रष्ट करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्याचबरोबर आपल्या सर्व मंडळींना देखील शांत केले. या सर्व मंडळींनी बाबासाहेबांचे शांततेचे आवाहन आज्ञा म्हणून स्वीकारले. ब्रिटिशांचे या चळवळीबाबतची भूमिका डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट हुडने म्हटल्याप्रमाणे या चळवळीचा हेतू अस्पृश्यांवर लादण्यात आलेले निर्बंध उठविणे हा आहे. विशेषतः अस्पृश्यांवरील पाणी भरण्याच्या ठिकाणी असलेले निर्बंध उठविणे हा आहे. तसेच या चळवळीचा उगम स्थानिक नाही त्यामागे मुंबईतील रोहिदास ज्ञानोदय समाज यासारख्या संघटनेची प्रेरणा असवी असे म्हटले होते. इतर अनेक बाबींची बारीकसारीक माहिती ठेवणाऱ्या या जिल्हादंडाधिकाऱ्याचे बहिष्कृत हितकारिणीसभेची माहिती नसावी याचे आश्चर्य वाटते.

अशांततेच्या संदर्भात कुलाबा जिल्ह्याचे मॅजिस्ट्रेट मि. हुडने गोपनीय पत्र पाठविण्यानंतर त्या पत्राची ताबडतोब दखल घेऊन महाबळेश्वर येथे मुक्कामी असलेल्या गव्हरनरने 4 मे 1924 रोजी उलट टपाली असे गोपनीय पत्र पाठविले की, मि. हुडच्या पत्राचा संदर्भ देऊन गर्व्हनरने पत्रात असे म्हटले की, महाड येथील बहिःष्कृत वर्गाला चिथावणी देणाऱ्या बाह्य नेत्यांना तुम्ही दिलेला सल्ला वरकरणी तटस्थतेचा वाटत असला तरी तो तसा नाही. तसेच तो निःपक्षपातीपणाचा देखील नाही. उलट या घटनेत स्थानिक म्युन्सिपालटीने अस्पृश्यांना जे हक्क दिले आहेत त्यांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या बहिष्कृत वर्गाचे हमखासपणे मनोधैर्य खच्ची करणारे आहे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी तुम्ही सर्व प्रकारच्या शक्यता सर्व उपाययोजना करा परंतु अशा मार्गाचा किंवा धोरणाचा अवलंब करणे म्हणजे बहिष्कृत वर्गात हक्कांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या आकांक्षावर थंड पाणी टाकण्यासारखे आहे. म्हणजेच वरिष्ठ जातीतील हेकट किंवा अभिमानी लोकांना त्यांचे वर्चस्व ठेवण्याला सहाय्य करणारे आहे. मि. हुडने दिलेल्या पत्रात म्हटले होते कि, डॉ. आंबेडकर यांची अशी चिथावणी आहे कि त्यांनी हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती करावी आणि ती करत असतांना उच्चवर्णियांनी अत्याचार केल्यास त्यापासून संरक्षण व्हावे म्हणून डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटकडे अर्ज करावा असा हेतू आहे. डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटने वरिष्ठांना लिहिलेल्या या गोपनीय पत्रात महाड येथील अस्पृश्यांना बाहेरुन चिथावणी देणाऱ्यांना त्याने कसा उपदेश केला तो लिहिला आहे. त्यांच्या या अशा प्रकारच्या कृतीमुळे त्यांच्या निरपराध अनुयांयांना बहिःष्कार किंवा प्रत्यक्ष हिंसाचार यामुळे त्रास होईल म्हणून त्यांनी प्रत्यक्ष कृतीऐवजी जनमत घयावे किंवा जनमताला शिकविण्याचा मार्ग चांगला राहील असे सुचविले होते. परंतु गव्हर्नरने उलटटपाली दिलेल्या पत्रात म्हटले होते की, जनमत शिकवणे यापेक्षा कागदावर असलेले हक्क प्राप्त करणे याला जास्त महत्त्व आहे. अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवली असता जातीय तणाव वाढू न देता काम करणे कोणत्याही मॅजिस्ट्रेटला तारेवरची कसरत आहे हे गव्हर्नरांना मान्य आहे परंतु तरीही चांगली चौकशी करून किमान न्याय बाजू घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती. शेवटी गव्हर्नरने डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटचे लक्ष वास्तवतेकडे वेधण्याचे काम केले आहे हे लक्षात येते. या पत्रावरून ब्रिटिश सरकारची भूमिका स्पष्ट होते कि, अस्पृश्यांना स्थानिक म्युनिसिपालटीने हे हक्क दिले आहेत ते अगोदरच जाहीर केले आहेत व ते मिळविण्याचाच प्रयत्न बहिष्कृत हितकारणी सभा करीत आहे म्हणून त्यांचा लढा न्याय्य आहे. म्हणून सरकारच्या मनात तटस्थतेची भूमिका असली तरी या संघर्षात अस्पृश्यांना प्रत्यक्ष सहकार्य करता येत नसले तरी प्रस्थापित वर्गाची बाजू मजबूत होईल असेही ब्रिटिश सरकारचे वर्तन नव्हते.

### *सारांश :*

एखाद्या समाज घटकाला हक्क किंवा अधिकार दिले असतांना त्यांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केले जात असतांना त्या विरोधी प्रस्थापित किंवा प्रतिगामींकडून हिंसाचार किंवा दबावाचा वापर केला जात असे परत ह्या प्रयत्नांना अधिकाऱ्यांनी मोडून काढले पाहिजे व प्रस्थापित वर्गाचे मनोधैर्य खच्ची केले पाहिजे. या भूमिकेमुळे ब्रिटिश सरकारची भूमिका न्यायपूर्ण होती कि ज्या वर्गाला हजारो वर्षापासून हक्कांपासून वंचित केले आहे त्यांना त्यांचा न्यायहक्क मिळावा यावरून स्पष्ट होते की, बाबासाहेबांच्या सत्याग्रहाच्या भूमिकेला ब्रिटिश सरकारचा विरोध नव्हता असे म्हणावे लागेल.

***संदर्भ :***

1) डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख.
2) कांबळे बी. सी., समग्र आंबेडकर चरित्र खंड – 1, भाग 1 ते 6 प्रथम आवृत्ती 16 डिसेंबर 1984, प्रकाशक बी सी कांबळे 11 / 174 आदर्श नगर, प्रभादेवी, मुंबई.
3) प्रा. डॉ. सी. एच. निकुंभे, डॉ. आंबेडकर सत्याग्रह आणि ब्रिटिश सरकार, पायल पब्लिकेशन, प्रकाशक – मिलींद माने, प्रथमावृत्ती 15 ऑगस्ट 2009.
4) वसंत मून, हरी नरके आणि इतर (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18, भाग 1 (1920 ते 1936), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरि़त्र – साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र.
5) ओमप्रकाश काश्यप (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण वाङ्मय, खंड 16.,डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान, सामाजिक न्याय और अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, 2000.



***प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड***
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.